लघुवाद न्यायालय, मुंबई या आस्थापनेवरील अस्थायी पदे पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांक: अस्थायी ०३१८/३९५/प्र.क्र.६२/कार्यासन ११
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १२ मार्च, २०१८.

पहा : १. शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक १००१/प्र.क्र.२९/२००१, वित्तीय सुधारणा, दि.१०/९/२००१

२. शासन निर्णय क्र.अस्थायी ०११८/२१६/प्र.क्र.२९/कार्यासन११, दि.२०/०१/२०१८.

३. शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क., दि.०५/०३/२०१८.

४. लघुवाद न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. B-४/Continuation/१५०२/२०१८, दि.१४/०२/२०१८.

शासन निर्णय :

लघुवाद न्यायालय, मुंबई या आस्थापनेवरील १३८ अस्थायी पदांना संदर्भाकित क्र.२ च्या शासन निर्णयान्वये दि. ०१/०१/२०१८ ते २८/०२/२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

२. लघुवाद न्यायालय, मुंबई या आस्थापनेवरील पुढील तक्त्यात नमूद १३८ अस्थायी पदांना या शासन निर्णयान्वये त्यापुढील म्हणजेच दि.०१/०३/२०१८ ते ३०/०९/२०१८ पर्यंतच्या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	अस्थायी पदांची संख्या
१	अतिरीक्त प्रबंधक	०१
२	सहायक प्रबंधक	०१
३	अधिक्षक	०३
४	स्वीय सहायक	०१
५	लघुलेखक (उ. श्रे.)	०८
६	लघुलेखक (नि. श्रे.)	०१
७	अनुवादक व दुभाषी	०९
८	सहायक अनुवादक	०१
९	न्याय लिपीक	०९
१०	रोखपाल	०१
११	लेखा लिपिक	०१
१२	लिपिक टंकलेखक	४६
१३	बेलिफ	१५
१४	नाईक	०१
१५	उद्वाहन चालक	०२
१६	हमाल	१८

१७	वाहनचालक	०२
१८	शिपाई	१३
१९	पहारेकरी	०१
२०	श्रॉफ	०३
२१	सफाईगार (Halalkhor)	०१
	एकूण पदे	१३८

३. यासाठी होणारा खर्च लघुवाद न्यायालय, मुंबई या कार्यालयासाठी मागणी क्र.जे-१, २०१४, न्यायदान, (१०६) लघुवाद न्यायालये, (००) १०६, लघुवाद न्यायालये, (००), (००)(०१) इलाखा शहर न्यायालये (अनिवार्य) (२०१४ ०२१६), ०१, वेतन या लेखाशीर्षाखाली सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षात मंजूर झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६ आ.पु.क.,दि.०५/०३/२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१२१६५८१४६६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anita Dipak Ripote

Digitally signed by Anita Dipak Ripote
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law And Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=28bdb8b03e204307a26238ccccb76a2c1eaa9ed4838f450b88dfb9ca9793b4b5, serialNumber=25e18795e96deb90b1428c41cb6c87bc90c3bb1f0ea059da3e0a07a3bc00c6c8, cn=Anita Dipak Ripote
Date: 2018.03.12 16:59:21 +05'30'

(अनिता रिपोटे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई
२. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई.
३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
४. महालेखापाल (लेखापरीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग, व्यय ५/आ.पु.क.कक्ष/अर्थसंकल्प ११, मंत्रालय, मुंबई.
८. विधि व न्याय विभाग, कार्या २०/२३, मंत्रालय, मुंबई.
९. निवडनस्ती (कार्यासन ११).